N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** सांगोला **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0801 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 08/07/2022 23:22 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 08/07/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/07/2022

**Time From (वेळेपासून):** 12:31 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:57 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 08/07/2022 **Time (वेळ):** 23:22 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 037 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/07/2022 23:22 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** समिर झेरक्स सेंटरच्या समोर,जय भवानी चौक सांगोला

(c) In case, **outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** आदम कासिम मुलाणी

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

ओळखपत्र विवरण **(राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No (अ. क्र.) | Address Type (पत्ताचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | जयभवानी चौक, सांगोला ,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | जयभवानी चौक, सांगोला ,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | राहुल बिरबल गंगणे | | | 1. घेरडी ,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दि.08.07.2022 श्री. आदम कासिम मुलाणी, वय 44 वर्ष, व्यवसाय - झेरक्स दुकान, रा. जयभवानी चौक, सांगोला ता. सांगोला, जि सोलापूर समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासह राहणेस असुन, सांगोला येथील जयभवानी चौक येथे सागर झेरक्स सेंटर नावाचे झेरक्स दुकान चालवुन माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी न्यु इंग्लीश स्कुल ऍन्ड ज्यु कलेज सांगोला येथे 11 वी व 12 वी मध्ये शिक्षण घेत असताना कलेजमध्ये किमान कौशल्य या विषयाअंतर्गत इलेक्ट्रीकचा कोर्स केला असल्याने मला इलेक्ट्रीकची काही कामे येत असल्याने माझ्या घरातील बरीचशी कामे ही मी स्वत:च करीत असतो. मागील आठवडयात फक्त माझ्याच घरातील अचानक लाईट गेल्याने सदरची लाईट कोणत्या कारणांस्तव गेली हे पाहण्याकरीता मी मिटरचे फयुज चेक केले असता ते व्यवस्थित होते. त्यामुळे मी मिटरचे कनेक्शन वायर काढुन चेक केले व त्यात देखील काही बिघाड न दिसल्याने मी सदरचे वायर परत मिटरला लावले. परंतु सदर वायर लावतेवेळी मी चुकीने इनची वायर आउटला व आउटची वायर इनला जोडलो. सदरच्या चुकीच्या जोडणीमुळे माझ्या मिटरमध्ये कोणताही प्रबलेम आला नसल्याने मला माझी झालेली चुक ही समजुन आली नाही.दि. 02/07/2022 रोजी मी माझ्या घरी हजर असताना दुपारी 04.00 वा. चे सुमारास आमचे घरी सांगोला एमएसईबी कार्यालयातील 01 इसम वायरमेनच्या खाकी गणवेशामध्ये आले व त्यांनी त्यांची ओळख वायरमन गंगणे अशी करुन देवुन आमचे घराचे मिटर चेक करुन मिटरचा फोटो काढला व सदर मिटरला जोडण्यात आलेली वायर ही चुकीची असल्याचे सांगुन तुम्ही विज चोरी केली आहे. आता तुम्हाला 50,000/- रुपये दंड लागणार असे म्हणु लागले त्यावर मी त्यांना काही दिवसांपुर्वी झालेला प्रकार सांगुन सदरची वायर ही चुकीने जोडली गेली असल्याबाबत सांगीतले. त्यावर त्यांनी नाही साहेब ऐकणार नाहीत आता तुम्हाला दंड भरावा लागेल असे म्हणु लागले त्यावर मी सदरची झालेली चुकीची कनेक्शन जोडणी ही मी जाणुनबुजुन केली नसल्याबाबत समजावुन सांगत असताना त्यांनी मला ठिक आहे मी साहेबांना बोलुन तुम्हाला दंड न करण्याबाबत सांगतो पण त्याकरीता तुम्हाला 10,000/- रुपये साहेबांकरीता द्यावे लागतील असे सांगीतले. सदरवेळी मी गरीब असुन सध्या पैसे नाहीत असे सांगीतले असता त्यांनी तुमच्याकडे पैसे आल्यानंतर फोन करुन द्या. असे म्हणुन एक फर्म भरुन त्यावर माझा मुलगा समिर याची सही घेवुन गेले. वायरमन गंगणे साहेबांकरीता म्हणुन माझ्याकडे मागत असलेली रक्कम ही लाचेची असल्याबाबत माझी खात्री झाली तरी त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी असे पोनि महाडिक यांना सांगितले. त्यावर पोनि महाडिक यांनी मला दिनांक 08.07.2022 रोजी सकाळी 11.00 वा. सांगोला ते पंढरपूरकडे जाणाऱ्या रोडच्या फबटेक इजिनिअरिंग कलेजच्या जवळ येवुन थाबावयास सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 08.07.2022 रोजी सकाळी 11.00 वा. सांगोला ते पंढरपूरकडे जाणाऱ्या रोडच्या फबटेक इंजिनिअरिंग कलेजच्या जवळ येवून थांबलो. त्यावेळेस पोनि/चंद्रकांत कोळी व पोनि/ उमाकांत महाडिक हे त्यांचे स्टाफसह तेथे शासकीय वाहनाने आले. त्यानंतर पोनि कोळी व पोनि महाडिक यांनी मला वाहनामध्ये बोलावून घेवून त्यांची व तेथे उपलब्ध असलेले समाज कल्याण विभाग या कार्यालयातील शासकीय पंच नदाफ व राठोड यांची ओळख करुन दिली व त्यानंतर पंच क्र.1 म्हणून श्री. गैबीसाहेब नदाफ व

पंच क्र.2 म्हणून श्री. सुभाष राठोड असे काम करण्याचे ठरवले. त्यानंतर पोनि कोळी व पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझे नाव गाव विचारले असता, मी माझे नाव गाव त्यांना सांगितले. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता, मी श्री. गंगणे वायरमन यांचे विरुध्दची वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. त्यानंतर पोनि कोळी व पोनि महाडिक यांचे सांगणेवरुन पंचासमक्ष मी माझी तक्रार लिहुन दिली. सदरची लेखी तक्रार पोनि कोळी व दोन्ही पंचानी वाचून त्यावर सह्या केल्या. त्यानंतर पोनि कोळी व पोनि महाडिक यानी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरवले. त्यासाठी आम्हास व्हईस रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन 8 जी.बी. चे मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मी व माझ्या सोबत पंच नं 1 गैबीसाहेब नदाफ यांना सुचना दिल्या की आम्ही वायरमन गंगणे यांना फोनवर संपर्क साधुन ते ज्या ठिकाणी भेटण्यास बोलवतील त्या ठिकाणी जावून वायरमन गंगणे यांची भेट घेवून त्यांच्याशी माझे कामाबाबत चर्चा करावी. त्यावेळी त्यांनी लाचेची मागणी केल्यास थोड्यावेळात आणून देत असल्याबाबत सांगावे, अश्या सविस्तर सुचना मला व पंच नं.1 गैबीसाहेब नदाफ यांना दिल्या. त्यानंतर मी माझा मोबाईल नंबर 8766947028 वरुन वायरमन गंगणे यांचा मोबाईल क्रमांक 7066045384 वर संपर्क साधुन त्यांना भेटण्यासाठी कोठे यावे याबाबत विचारना केली असता, वायरमन गंगणे हे पाच ते दहा मिनिटात ऑफिसला जावून येतो असे म्हणाले असता, त्यावर मी त्यांना दुकानावर या असे सांगुन फोन बंद केला. त्यामुळे पोनि कोळी यांनी वायरमन गंगणे यांची भेट माझ्या दुकानावर घ्यावयाची ठरल्याने मला व पंच नं.1 गैबीसाहेब नदाफ यांना माझे जयभवानी चौकातील समीर झेरक्स सेंटर या दुकानाकडे माझ्या गळ्यात व्हईस रेकर्डर चालु करुन शर्टचे आतील बाजूस आडकावून माझेकडील स्प्लेंडर कंपनीची दुचाकी एम एच 45 एच 5655 वरुन पाठवले. त्यावरून मी, पंच नं 1 गैबीसाहेब नदाफ यांच्यासह वायरमन गंगणे यांची भेट घेण्यासाठी जात असताना, वाटेतच वायरमन गंगणे हे त्यांच्या मोटार सायकलवरुन पंढरपूरकडे जाणाऱ्या रोडने जाताना दिसले. त्यामुळे मी लगेच माझी दुचाकी थांबवुन परत वायरमन गंगणे यांच्या मोटार सायकलच्या पाठीमागे जावून बिलेवाडी फाटा येथे त्यांना थांबवुन त्यांची भेट घेतली, त्यावेळेस मी वायरमन गंगणे यांना माझ्या कामाबाबत चर्चा करत असताना, श्री. वायरमन गंगणे म्हणाले की, पसतीस ते चाळीसच्या आसपास बील निघतय तेवढं भराव लागणार.. तेवढ भरण शक्य हाय का.., त्यावर मी त्यांना काय राव तुम्ही, असे म्हणालो असता, त्यावर श्री. वायरमन गंगणे म्हणाले की, दहा हजार कुट आणि चाळीस हजार E.., त्यावर मी त्यांना काही तरी कमी करा.., असे म्हणालो असता, श्री. वायरमन गंगणे म्हणाले की मी सांगितल तेवढच.., त्यावर मी पुन्हा एकदा मला शेवटच सांगा.. असे म्हणालो असता, श्री. वायरमन गंगणे म्हणाले की, दहा हजार रुपये आणि नंतर वरच काय असेल ते.. त्यावर मी त्यांना हजर पाचशे कमी करा, असे म्हणालो असता, त्यावर श्री. वायरमन गंगणे म्हणाले की, काय सुध्दा होत नाही तेवढ करा आणि भेटून जावा.., असे म्हणाले. त्यानंतर मी त्यांना काही तरी कमी करा की असे म्हणलो असता, त्यावर वायरमन गंगणे म्हणाले की, माझा विषय असता तर मी त्याच दिवशी सांगितल असत, त्यावर मी त्यांना साहेबांना किती दयायाच असे म्हणलो असता, वायरमन गंगणे म्हणाले की, दहा त्यांना दिला विषय मिटला, असे म्हणाले, त्यावर मी त्यांना साहेबांचा दहा हजार हायत का, त्यावर वायरमन गंगणे म्हणाले की, त्यांचे तेवढे आहेत. त्यावर मी त्यांना साहेबाला दहा हजार.. मग तुम्हाल काय नाहय, त्यावर वारमन गंगणे म्हणाले की, हे अजिबात नाहय त्या फंदयात पडत नाहय, असे बोलुन इतर चर्चा करुन मी पुन्हा श्री. वायरमन गंगणे यांना किती वेळ लागेल असे विचारले असता, त्यावर वायरमन श्री. गंगणे म्हणाले की, अर्धा-पावन तासाने परत येणार आहे असे म्हणाले, त्यावर मी त्यांना नमाजला जाणार आहे त्यामुळे एक किंवा दिड च्या सुमारास माझे जयभवानी चौकातील झेरक्स सेंटर येथे भेटण्याचे ठरले. त्यामुळे मी व पंच नं.1 गैबीसाहेब नदाफ असे नियोजित ठिकाणी परत आलो. तेथे पोनि कोळी यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकर्डर बंद करुन काढून पंच नं.1 गैबीसाहेब नदाफ व मला हकीकत विचारून घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्त प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि कोळी यांनी व पंचांनी व्हईस रेकर्डरमध्ये माझ्यात व वायरमन श्री. गंगणे यांच्यात झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये वायरमन श्री. गंगणे यांनी साहेबांकरिता 10,000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले व सदर लाचेची रक्कम जयभवानी चौकातील माझे समीर झेरक्स सेंटर येथे देण्याचे ठरले. त्यामुळे पोनि कोळी, पोनि महाडिक, दोन्ही शासकीय पंच व सापळा पथक यांनी पुढील सापळा कारवाई ही जयभवानी चौकातुन करण्याची सवनिुमते ठरवले. त्याकरिता सापळा पथक शासकीय वाहनाने जयभवानी चौकातील जुने सिनेमा थेटर आवारात एका बंद दुकानाच्या समोर जावुन शासकीय वाहन थांबवले. वायरमन श्री. गंगणे यांनी सदरची लाच ही त्यांच्या साहेबांकरिता मागितली असल्याने पुन्हा पोनि कोळी यांनी माझे व वायरमन श्री. गंगणे यांचेत झालेल्या चर्चे प्रमाणे वायरमन श्री. गंगणे यांचे साहेबांची पडताळणी करण्याचे सर्वानुमते ठरविले. त्याकरिता पोनि कोळी यांनी मला वायरमन श्री. गंगणे यांना फोन लावुन कुठे आहेत याची खात्री करण्यास सांगितली. त्यावरुन मी माझ्या मोबाईल फोनवरुन वायरमन श्री. गंगणे यांना फोन केला असता, वायरमन श्री. गंगणे हे माझ्या दुकानाजवळ आले असलेबाबत सांगितले. त्यामुळे पोनि कोळी यांनी पुन्हा माझ्या गळ्यात व्हईस रेकर्डर चालु करुन शर्टचे आतील बाजूस आडकावून वायरमन श्री. गंगणे यांचे भेट घेण्यासाठी पाठविले असता, सदर भेटी दरम्यान मी वायरमन श्री. गंगणे यांना राऊत साहेबांना फोन लावुन दया असे म्हणालो असता, वायरमन श्री. गंगणे म्हणाले की, ते फोनवर बोलत नायत.. काय असेल ते माझ्या हातात आणुन दया, असे म्हणाले. त्यावर मी बोलु का, असे म्हणालो असता, वायरमन श्री. गंगणे म्हणाले की, बोलतच नाहीत ते तुम्हाला बील भरायला लावतील शंभर टक्के, त्यावर मी म्हणालो की, तुमच्याकड आहे होय सगळ.. कन्टक्ट करु देत नाही का कुणाला, त्यावर वायरमन श्री. गंगणे म्हणाले की, त्यांना साहेबांनी असे सांगितले आहे की, पाच जणांचे बील काढलेले आहेत, तुमच्या एकटयाच बील काढायच राहिलेत.. बील काढुन टाका बील भरायला सांगा असे साहेब बोलेले आहेत. त्यानंतर वायरमन श्री गंगणे यांनी मला हाताचा ईशारा करुन पैसे देण्याचा ईशारा केला असता, त्यावर मी त्यांना पाच मिनिटात घेवून येतो असे सांगुन मी व पंच 1 गैबीसाहेब नदाफ असे सापळा पथक थांबले त्या ठिकाणी परत आलो. त्यावेळेस पोनि कोळी यांनी माझ्या गळयात अडकविलेला व्हाईस रेकर्डर बंद करुन पंच नं.1 गैबीसाहेब नदाफ व मला हकीकत विचारून घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्त प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि कोळी यांनी व पंचांनी व्हईस रेकर्डरमध्ये माझ्यात व वायरमन श्री. गंगणे यांच्यात झालेले संभाषण ऐकले. सदर झाले संभाषणात वायरमन श्री. गंगणे हे माझ्याकडे त्यांचे वरीष्ठांचे नावाने लाचेची मागणी करत आहेत. तसेच ते मला त्यांचे वरीष्ठ अधिकारी यांची भेट घेण्यास टाळाटाळ करत असून उलट मी त्यांना भेटल्यास त्यांचे साहेब शंभर टक्के दंड भरण्यास सांगितली असे बोलुन वायरमन गंगणे हे त्याचे वरीष्ठाचे नावाने स्वताकरीता लाचेची मागणी करीत असल्याचे झालेल्या संभाषणावरुन स्पष्ट झाले. तसेच सदर लाचेची रक्कम जयभवानी चौकातील माझे समीर झेरक्स सेंटर येथे घेवून येण्यास सांगितले. त्यामुळे लगेच पोनि कोळी यांच्या सुचनेवरून मी वायरमन श्री. गंगणे यांना देण्यासाठी माझ्याकडे असलेले 10,000/- रूपये हजर केले. त्यात 500/- रूपये दराच्या 20 नोटा होत्या. मी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक पोनि कोळी यांचे सुचनेवरुन पोक सनके यांनी कोऱ्या कागदावर लिहुन घेवून त्याचेवर पोनि कोळी व दोन्ही पंचानी सदरच्या नोटांचे नंबर लिहिलेल्या कागदावर सह्या केल्या. सदर नोटांना ऍथासीन पावडर लावण्याची, त्याचे प्रात्यक्षीक करण्याची कार्यवाही केली व सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचना देवून सविस्तर सापळापूर्व पंचनाम्याची कार्यवाही शासकीय वाहन क्रमांक एम.एच.12 युसी 4108 मध्ये करण्यात आली. त्यानंतर यातील वायरमन श्री. गंगणे यांच्यावर जयभवानी चौकातील माझे समीर झेरॉक्स सेंटर व आजु-बाजूस लाचेचा सापळा आयोजीत केला. त्यामध्ये मी व पंच नं 1 गैबीसाहेब नदाफ असे दोघेजन चालत पुढे गेलो त्या पाठोपाठ पोनि कोळी, पोनि महाडिक व सापळा पथक असे चालत आले. सदर ठिकाणी वायरमन श्री. गंगणे हे माझ्या दुकानासमोर उभे होते त्यावेळेस मी त्यांच्याजवळ जावून टायमिंग झाला.. नमाजाला जायचाय असे म्हणालो असता, वायरमन श्री. गंगणे

माझ्याकडे पाहून चालतय मग करा असे बोलले, त्यावर मी त्यांना नाय मला नमाजला जायचाय ओ असे म्हणालो असता, वायरमन श्री गंगणे हे दुकानात ठेवा असे म्हणाले, त्यावर मी पुन्हा मला नमाजला जायचाय असे बोललो असता, वायरमन श्री. गंगणे म्हणाले की, जावा की मग असे बोलुन त्यांचा उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासून पैसे देण्याचा ईशारा केले असता, मी माझ्या शर्टाच्या डाव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून वायरमन श्री. गंगणे यांच्यासमोर धरली असता, ती लाच रक्कम वायरमन श्री. गंगणे यांनी उजव्या हाताने स्विकारुन ती लाच रक्कम त्यांच्या अंगातील शर्टाच्या डाव्या खिशात ठेवली. त्यावेळेस मी माझा डाव्या हात माझ्या डोक्यावरुन फिरवून केलेल्या नियोजीत इशाऱ्यावरून सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर ठिकाणी येवून पोनि कोळी यांनी माझ्या गळ्यातील व्हाईस रेकॉर्डर बंद करुन ताब्यात घेतला व माझ्याकडून लाच रक्कम स्विकारलेले वायरमन श्री. गंगणे यांना ताब्यात घेतले.
त्यानंतर पोनि कोळी यांनी जयभवानी चौकात शासकीय वाहन बोलवुन सदर वाहनात दोन्ही पंचासमक्ष सदर इसमाचे दोन्ही हातांची, कपडयाची पुरेसा अंधार करून अ.वा. दिव्याच्या निळे प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताच्या बोटाच्या पेऱ्यांवर व अंगावरील नेसते शर्टच्या डाव्या बाजुच्या खिश्याच्या आतील बाजूस व तोंडास अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. तसेच त्यांचेकडे मिळून आलेल्या नोटांची कागदावर नमूद केलेल्या नोटांच्या नंबराशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. सदर नोटांची देखील ऍ.वा.दिव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटांवर देखील अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. पोनि कोळी यांनी सदर इसमास त्याचे नांव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव राहुल बिरबल गंगणे, वय 30 वर्षे, पद-वायरमन (टेक्निशीयन), म.रा.वि.वि.कंपनी मर्या. शाखा सांगोला, जि. सोलापूर, रा. घेरडी, ता. सांगोला, जि. सोलापूर असे सांगितले.
त्यानंतर पोनि कोळी यांनी राहुल बिरबल गंगणे यांच्या ताब्यातुन घेतलेल्या सदरच्या नोटा व राहुल बिरबल गंगणे यांनी लाचेची रक्कम ठेवलेला शर्ट पुराव्याकामी जप्त करण्यात आलेला आहे. सदरबाबत सविस्तर पडताळणी, सापळापूर्व व यशस्वी सापळा पंचनामा हॉटेल ऍम्बेसीटर, एस. टी. स्टॅण्डयाच्या समोर सांगोला येथे दि. 08.07.2022 रोजी पूर्ण करण्यात आलेला आहे.
तरी दि. 08.07.2022 रोजी 12.31 वा ते दिनांक 08.07.2022 रोजीचे 13.57 वा. दरम्यान राहुल बिरबल गंगणे, पद-वायरमन (टेक्निशीयन) यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून त्यांना कायद्याने मिळावयाचे त्या खेरीज लाच म्हणून माझे विज मीटर मध्ये छेडछाड केल्याचे सांगुन 50,000/- रूपये दंड भरावे लागतील असे सांगुन दंड न आकारण्याकरिता माझ्याकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करून, ती लाच रक्कम राहुल बिरबल गंगणे, पद-वायरमन (टेक्निशीयन), यांनी स्वत: स्विकारून सांपत्तीक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी राहुल बिरबल गंगणे, वय 30 वर्षे, पद-वायरमन (टेक्निशीयन), म.रा.वि.वि.कंपनी मर्या. शाखा सांगोला, जि. सोलापूर, यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई होणेकरिता फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा जबाब दिला स.ता.म

समक्ष

(चंदकांत कोळी)
पोलीस निरीक्षक
ऍन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर

**3.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Suhas Laxman Jagtap(I (Inspector)) / PBMH73577 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची

ठाणे अंमलदार

Name (नाव): Suhas Laxman Jagtap

Rank(पद): I (Inspector)

No.(सं.): PBMH73577